महाराष्ट्र शासन
**महसूल व वन विभाग**
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक - ०२०/२६०५०००९ ई-मेल dlrmah.mah@nic.in

---

क्र.भू-२/ सुधारित मोजणी फी / C.N.1851722/२०२५ दिनांक :-२५/०३/२०२६

**प्रति,**
उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर,
अमरावती, नागपूर

**विषय:-** राज्यातील धारण जमिनीच्या सर्व पोट हिश्श्यांची मोजणी होण्याच्या अनुषंगाने पोट हिस्सा मोजणी फी, शासकीय / महानगरपालिका/नगरपालिका नगरपंचायत/विविध प्राधिकरणे/ महामंडळे यांच्या मालकीच्या जमिनींच्या मोजणी फी मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्याबाबत.
**संदर्भ:-** शासनाकडील पत्र क्रमांक १६०६१४३/भूमापन दिनांक २५ मार्च २०२६.

राज्यातील धारण जमिनीच्या सर्व पोट हिश्श्यांची मोजणी होण्याच्या अनुषंगाने पोट हिस्सा मोजणी फी, शासकीय / महानगरपालिका/नगरपालिका नगरपंचायत/विविध प्राधिकरणे/महामंडळे यांच्या मालकीच्या जमिनींच्या मोजणी फी मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्याबाबत, शासनाच्या संदर्भिय दिनांक २५ मार्च २०२६ नुसार मोजणी शुल्कामध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(१) नगर पंचायत, नगरपालिका, महानगरपालिका व विकास प्राधिकरणांच्या कार्यक्षेत्राबाहेरील ग्रामीण भागातील जमिनींच्या पोटहिस्सा मोजणीसाठी प्रति पोटहिस्सा रुपये २०० इतकी नाममात्र फी निश्चित करण्यात आली आहे. तथापि गट नंबर किंवा सर्व्हे नंबरमधील सर्व पोटहिश्श्यांची मोजणी एकाच वेळी करणे आवश्यक राहील.

(२) शासकीय जमिनी व मालमत्तांच्या मोजणीसाठी देखील स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ च्या आदेशात नमूद करण्यात आलेल्या नियमित दराच्या केवळ २५ टक्के इतके मोजणी शुल्क आकारण्यात यावे.

(३) महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, विविध विकास प्राधिकरणे आणि महामंडळे यांच्या मालकीच्या जमिनींच्या मोजणीसाठी नियमित दराच्या ५० टक्के इतके मोजणी शुल्क आकारण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

त्यानुषंगाने उपरोक्त मोजणी प्रकार ई मोजणी व्हर्जन २.० या आज्ञावलीत अमलात आणणेची कार्यवाही करणेत येणार आहे. त्याप्रमाणे दिनांक १/०४/२०२६ पासून पोट हिस्सा मोजणी फी, शासकीय / महानगरपालिका/ नगरपालिका नगरपंचायत/ विविध प्राधिकरणे/ महामंडळे यांच्या मालकीच्या जमिनींच्या मोजणी फी प्रकार राज्यातील सर्व भूमि अभिलेख कार्यालयात प्रत्यक्ष लागू करणेत येत आहे. तरी याबाबतची कार्यवाही तात्काळ करणेबाबत आपल्या अधिनस्त कार्यालयांना सूचना द्याव्यात.

Shailesh

शैलेश नवाल (भा.प्र.से.) २७/३/२६

जमाबंदी आयुक्त आणि संचालक

भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे

Scanned with OKEN Scanner